# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर, ४४० ००१

ईमेलद्वारे

क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.१३५(२२-२३)/१८४०
नागपूर ४४०००१, दिनांक ०१/०३/२०२३

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), सर्व
वनसंरक्षक (प्रा.) सर्व

**विषय :** लेखापाल सरळसेवा भरती -२०२३
भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील पदे सरळसेवेने भरणेबाबत

**संदर्भ:**
१) शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. प्रानिमं १२२२/ प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ४/५/२०२२
२) शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.१३६/ का. १३-अ, दिनांक २१/११/२०२२
३) शासन, महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र. एफएसटी-०६/२२/ प्र.क्र. १२८/फ-४, दिनांक २७/१२/२०२२ (गट-ब, अराजपत्रित, गट-क व ड)
४) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.१३५(२२-२३)/२९१, दिनांक १/२/२०२३

प्रस्तुत प्रकरणी या कार्यालयाचे संदर्भ ४ अन्वये लेखापाल पदाचे मागणीपत्र या कार्यालयास सादर करणेबाबत सुचना दिलेल्या होत्या. त्या अनुषंगाने सर्व वनवृत्तांनी मागणीपत्र या कार्यालयास सादर केला आहे. आपण सादर केलेल्या मागणीपत्राचे आधारे लेखापाल पदाकरीता राज्यस्तरीय जाहिरातीचा मसूदा तयार केला आहे. तरी सदर जाहिरातीचे मसूद्यामध्ये काही सुधारणा असल्यास त्याबाबत तात्काळ या कार्यालयास अवगत करावे. तसेच जाहिरातीतील परिशिष्ट-१ मध्ये नमुद पदांबाबत खात्री करावी. जाहिरातीतील **परिच्छेद ६** हा टि.सी.एस.-आयओएन कंपनीसोबत कराराची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांचेशी विचारविनिमय करुन अंतिम करण्यात येणार असल्याने सदर परिच्छेदातील तपशीलात बदल होण्याची शक्यता आहे.

तरी वरीलप्रमाणे अभिप्राय तात्काळ या कार्यालयास सादर करावे.

**सहपत्र** :- वरीलप्रमाणे

(शोमीता बिश्वास)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन-दुय्यम संवर्ग)

**प्रतिलिपी (ई-मेलद्वारे)**:-

१) प्रधान सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) प्रशासकीय अधिकारी, कक्ष-१३

# <u>जाहीरात</u>

## प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख),महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

**“वनभवन”, रामगिरी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४०००१**

### वन विभागातील लेखापाल (गट क) भरती प्रक्रिया सन २०२३

**जाहीरात क्रमांक** ---------                                                   दिनांक ------

वनविभागातील लेखापाल (गट क) पदे सरळसेवेने भरावयाची आहेत. त्यासाठी अर्हता धारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पद्धतीने www…………….......... या संकेत स्थळावर अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहीरात ……………. या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरिता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पद्धतीनेच केलेले अर्ज व ऑनलाईन पद्धतीनेच परीक्षा शुल्क स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी संकेतस्थळ (.....................) पाहून भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक --------- | दिनांक ……… |

२.	**भरतीकरीता उपलब्ध पदे व वेतनश्रेणी** :-

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | भरतीकरीता एकूण उपलब्ध पदे |
|---|---|---|---|
| १ | लेखापाल (गट-क) | S-१० : रु. २९०००-९२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते (सातव्या वेतन आयोगानुसार) | १२७ |

वरील पदांचा वनवृत्तवार तपशील सोबतच्या **परिशिष्ट-१** मध्ये नमुद केल्याप्रमाणे आहे.

३. **शैक्षणिक पात्रता** :-

३.१ उमेदवाराने मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी धारण करणे आवश्यक आहे.

३.२ अर्ज स्विकारणाच्या अंतिम दिनांकास सदर अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

३.३ मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.

४. **वयोमर्यादा** :-

४.१ **वयोमर्यादा गणण्याचा दिनांक :-** अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक

४.२ लेखापाल पदासाठी किमान व कमाल वयोमर्यादा खालीलप्रमाणे राहील.

| **अ. क्र.** | **घटक** | | **वयोमर्यादा** | |
|---|---|---|---|---|
| | | | **किमान** | **कमाल** |
| १ | अमागास | | १८ | ३८ |
| २ | मागासवर्गीय / अनाथ / आ.दु.घ. | | १८ | ४३ |
| ३ | प्राविण्याप्राप्त खेळाडू | अमागास | १८ | ४३ |
| | | मागासवर्गीय / अनाथ /आ.दु.घ. | १८ | ४३ |
| ४ | माजी सैनिक | अमागास | १८ | ३८+ सेनिकी सेवेचा कालावधी +३ |
| | | मागासवर्गीय / अनाथ /आ.दु.घ. | १८ | ४३+ सेनिकी सेवेचा कालावधी +३ |
| ५ | दिव्यांग | | १८ | ४५ |
| ६ | प्रकल्पग्रस्त | | १८ | ४५ |
| ७ | भूकंपग्रस्त | | १८ | ४५ |
| ८ | पदवीधर अंशकालीन कर्मचारी | | १८ | ५५ |
| ९ | रोजंदारी मजूर | | १८ | ५५ |

५. **परीक्षा शुल्क** :-

**५.१** उमेदवारांना अर्ज भरण्यासाठी खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क भरणा करावा लागेल.

| **प्रवर्ग** | **शुल्क** |
|---|---|
| अमागास | रु. १०००/- |
| मागासवर्गीय / आ.दु.घ/ अनाथ | रु. ९००/- |
| माजी सैनिक | ० |

५.२ माजी सैनिक यांना शासन निर्णय क्र. आरटीए-१०७९/०/४८२/XVI-A, दिनांक ३/७/१९८० नुसार परीक्षा शुल्कातून सूट देण्यात येत आहे.

५.३ परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

## ६. **अर्ज करण्याची पध्दत** :-

६.१ उमेदवार हे फक्त कोणत्याही **एका वनवृत्तासाठी** ऑनलाईन पध्दतीने अर्ज करु शकेल. एक पेक्षा अधिक वनवृत्तासाठी अर्ज सादर केल्याचे आढळल्यास पहिला सादर केलेला अर्ज ग्राह्य धरून इतर अर्ज रद्द ठरतील. उमेदवाराने ज्या वनवृत्तासाठी अर्ज केलेला आहे त्याच वनवृत्तासाठी त्याचा विचार करण्यात येईल व निवड झाल्यास त्याच वनवृत्तात पदस्थापना करण्यात येईल.

६.२ अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. जिल्हा रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय इत्यादी कार्यालयांकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील स्वतः ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

६.३ उमेदवाराला ................................. या संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल. उमेदवाराने आपल्या उजव्या बाजूला असलेल्या ‘सूचना’ या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवारला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करून युजर नेम, पासवर्ड आणि ई-मेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या/तिच्या प्रमाणित ई-मेल आयडीवर सक्रियतेची लिंक मिळेल जी त्याच्या साईनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे तिचे खाते सक्रिय करण्यासाठी त्याच्या/तिच्या ई-मेल आयडीवर मिळालेल्या सक्रियतेच्या लिंकवर क्लिक करावे (Activation लिंक ही २ दिवसाकरिता active असेल). उमेदवाराने त्याची/तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रिय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरुन केव्हाही लॉग इन होता येईल. युजर नेम व पासवर्ड जतन करण्याची जबाबदारी उमेदवारांची असेल.

६.४ उमेदवाराचे नाव, वडिलांचे, पतीचे नाव, आडनाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल.

६.५ छायाचित्र आणि स्वाक्षरी आपलोड करण्यासंबंधी माहिती - कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी २०० pixel असलेले छायाचित्र स्कॅन करून अपलोड करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची ६० pixel आणि रुंदी १४० pixel असावी. प्रतिमेचे आकारमान ३ KB ते ५० KB च्या दरम्यान असावे. उमेदवाराने अलीकडील छायाचित्र (फोटोग्राफ) अपलोड करणे आवश्यक आहे.

६.६ पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरूपी पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, जिल्हा, राज्य, पिन कोड इ. सहित माहिती भरावी.

६.७ त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाउन मधून त्याने/तिने आपला जात प्रवर्ग निवडावा.

६.८ जर उमेदवाराने एका पेक्षा अधिक अर्ज केलेले आहेत असे आढळून आल्यास त्याचा कालक्रमानुसार पहिला अर्ज ग्राह्य धरण्यात येईल.

६.९ ज्यांच्या कडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी. तसेच उमेदवाराने आधार क्रमांक / आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी. समांतर आरक्षण (लागू असल्यास) त्यासंबंधीची माहिती द्यावी लागेल.

६.१० तसेच मराठी भाषेतील प्राविण्य, संगणक अर्हता प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतक-याचे पाल्य, अपंगत्वाचा प्रकार (लागू असल्यास) या यासंबंधीची माहिती द्यावी लागेल.

६.११ शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे.

६.१२ एकदा शैक्षणिक तपशील प्रविष्ट केले की, अर्जदारास “पुढे” या बटनावर क्लिक करावे लागेल. त्या बटनावर क्लिक केल्या नंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशीलात बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

६.१३ त्यानंतर उमेदवारास संबंधित पदांसाठी आवश्यक असलेली पात्रतेबद्दलची माहिती देऊन ती सेव्ह करणे आवश्यक आहे.

६.१४ उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परीक्षा केंद्राकरिता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करून देण्यात आलेल्या तीनही पसंतीक्रमाच्या यादीतील प्रत्येकी एका पर्यायाची निवड करणे आवश्यक आहे. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायापैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमून देण्यात येईल.

६.१५ उमेदवाराने सगळ्या नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. त्यानंतर ऑनलाइन पध्दतीने (इंटरनेट बँकिंग, क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड, भीम UPI) आवश्यक तो परीक्षा शुल्क भरणा करावा. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा “सबमीट” हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाउनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल.

६.१६ ऑनलाइन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेस मध्यरात्री १२.०० वाजल्यानंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

६.१७ जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे की, हॉल तिकीट, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियासाठी विचारात घेता येईल. कोणत्याही ड्यूप्लिकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी ………………… वर लिहा किंवा टोल फ्री नंबर …………………वर कॉल करा.

**नोंद**:- नोंदणी मधील तपशील जसे की वापरकर्ता नाव (USERNAME), ई-मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण), पसंतीचे स्थान, जन्म तारीख, उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन** :-

(१) युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो.

(२) अर्ज प्रिंट करण्यासाठी "प्रिंट प्रिव्हयू" या पर्यायावर क्लिक करा.

**नोंद**:- उमेदवाराने आपला PDF स्वरुपातील अर्ज, परीक्षा प्रवेश पत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत स्वतः जवळ ठेवावा.

६.१८ अर्ज सादर केल्यानंतर विहीत परिक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

६.१९ प्रवेशपत्र उमेदवाराने परिक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व लेखी परीक्षेच्या वेळी व त्यापुढे प्रत्येक टप्प्यात त्याची प्रत उमेदवाराने सोबत आणने सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेकरीता प्रवेश दिल्या जाणार नाही.

६.२० अर्ज भरण्यासंबंधी हॉल टिकीट (प्रवेशपत्र) उपलब्धतेसाठी ई तत्सम बाबीसाठी www.................................... संकेतस्थळावर संपर्क करावा. त्याचप्रमाणे अर्ज भरण्यास काही अडचण असल्यास .................. या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

६.२१ ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परीक्षेची रुपरेषा/वेळापत्रक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. संकेतस्थळावर भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

६.२२ **महत्वाच्या सूचना** :-

६.२३.१ उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थिती मध्ये बदलण्यात येणार नाही.

६.२३.२ परीक्षा केंद्र किंवा परीक्षा शहर बदल बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थिती मध्ये वैद्यकीय किंवा इतर कारणासाठी स्विकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.

७. **निवडीची पध्दत** :- ऑनलाइन पध्दतीने सादर केलेल्या अर्जातील माहितीनुसार पात्र ठरणा-या उमेदवारांची महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक एफएसटी-०६/२२/प्र.क्र.१२८/फ-४, दिनांक २७/१२/२०२२ व शासनाचे अनुषंगिक दिशानिर्देशानुसार निवड करण्यात येईल. निवडीबाबत टप्पे यासोबत **परिशिष्ट-२** म्हणून जोडले आहे.

**७.१ लेखी परीक्षा** :-

७.१.१ ऑनलाईन अर्जातील माहितीनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची, २०० गुणांची (एकूण १०० प्रश्न, प्रत्येक प्रश्नाला २ गुण) स्पर्धात्मक लेखी परिक्षा **टि.सी.एस. आयओएन (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिर्सेस लिमिटेड) यांचेमार्फत** घेण्यात येईल. लेखी परीक्षेमध्ये खालीलप्रमाणे ४ विषयांना गुण देण्यात येईल.

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | मराठी | ५० |
| २ | इंग्रजी | ५० |
| ३ | सामान्य ज्ञान | ५० |
| ४ | बौधिक चाचणी | ५० |

७.१.२ लेखी परीक्षेतील प्रश्नांचा स्तर हा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील, परंतू वरील मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) दर्जाच्या समान राहील.

७.१.३ परीक्षा ही ऑनलाईन पध्दतीने (Computer based test) वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात आयोजित करण्यात येईल.

७.१.४ परीक्षा ही २ तासाची राहील.

७.१.५ उमेदवाराने लेखी परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. ४५% किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविणारे उमेदवार गुणवत्तेनुसार लेखापाल पदाकरीता पात्र राहतील. ४५% पेक्षा कमी गुण मिळविणारे उमेदवार भरती प्रक्रियेतून बाद होतील.

**७.२ लेखी परीक्षेचा निकाल** :- वनवृत्तनिहाय लेखी परीक्षेचा निकाल www.---------------- चे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवाराने ज्या वनवृत्तासाठी अर्ज केला आहे त्याच वनवृत्तासाठी त्याचा विचार करण्यात येईल.

**७.३ कागदपत्र तपासणी** :- लेखी परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करणा-या उमेदवारांची प्रादेशिक निवड समितीच्या सूचनेनुसार कागदपत्राची तपासणी करण्यात येईल. कागदपत्र तपासणीच्या वेळेस उमेदवारांना लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील (सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-३** प्रमाणे). जे उमेदवार आवश्यक कागदपत्रे सादर करणार नाहीत किंवा गैरहजर राहतील ते भरती प्रक्रियेतून बाद ठरतील.

**७.४ निवड यादी व प्रतिक्षा यादी जाहीर करणे** :- लेखी परीक्षेत प्राप्त गुणांच्या गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल व त्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण विचारात घेऊन रिक्त पदांच्या अनुषंगाने वनवृत्तवार निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यात येऊन ती www.............. या वेबसाईटवर वर प्रसिध्द करण्यात येईल. निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करताना सामान्य प्रशासनविभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ४/५/२०२२ मधील परिच्छेद १० मधील तरतूदीनुसार करण्यात येईल.

**७.५ निवड यादीची कालमर्यादा** :-

७.५.१ प्रादेशिक निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार ज्या दिनांकापर्यंत रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, त्यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

७.५.२ प्रादेशिक निवड समितीने तयार केलेल्या निवडसूचीमधून ज्येष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर विहित मुदतीत रुजू न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार, किंवा जात प्रमाणपत्र / अन्य आवश्यक प्रमाणपत्राची अनुपलब्धता / अवैधता किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास अथवा शिफारस केलेला उमेदवार रुजू झाल्यानंतर नजिकच्या कालावधीत त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्याचा मृत्यू झाल्याने पद रिक्त झाल्यास, अशी पदे त्या त्या प्रवर्गाच्या निवडूचीतील अतिरिक्त उमेदवारांमधून (प्रतिक्षायादीतील) वरिष्ठतेनुसार उतरत्या क्रमाने भरण्यात येतील. मात्र, अशी कार्यवाही निवडसूचीच्या कालमर्यादेत करण्यात येईल.

## ८. पदसंख्या व आरक्षणसंदर्भात सर्वसाधारण तरतूदी :-

८.१ सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर पदसंख्या मध्ये बदल होण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर आरक्षण संबंधी शासन धोरणात बदल झाल्यास तो त्याप्रमाणे लागू राहील. याबाबत अद्यावत सुचना www.................... या पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात येईल.

८.२ प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे उपलब्ध नाहीत. तथापि, जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर मागास प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाकरीता पदे उपलब्ध होण्याची व विद्यमान पदसंख्येमध्ये बदल / वाढ होण्याची शक्यता आहे. यास्तव या जाहिरातीमध्ये पदे आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंख्या कमी असल्यामुळे अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

८.३ महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domicile) असल्याबाबत तसेच समाजाच्या उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्याबाबत (नॉन क्रीमीलेअर) (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे अर्जात नमुद करणे आवश्यक आहे.

८.४ वि.जा.-(अ), भ.ज.-(ब), भ.ज.-(क) व भ.ज.-(ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रचलित शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

८.५ एखादी जात / जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे अर्ज करतानाच उपलब्ध असेल तर संबंधित जात / जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

८.६ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ व शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग दिनांक १९ डिसेंबर २०१८ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

८.७ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ व दिनांक ३१ मे २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

८.८ शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग क्र. सीबीसी-२०१२/प्र.क्र.१८२ /विजाभज-१, दिनांक २५ मार्च २०१३ अन्वये विहीत कार्यपध्दतीनुसार संबंधीत जाहिरातीमध्ये नमूद अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटामध्ये मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी गृहीत धरण्यात येईल.

८.९ शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग क्र. सीबीसी-२०१३/प्र.क्र.१८२ /विजाभज-१, दिनांक १७ ऑगस्ट २०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गट यामध्ये मोडत नसल्याचे नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

८.१० सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मुळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचुकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

८.११ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणा-या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

८.१२ कोणत्या प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक व समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

८.१३ सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ठ प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

८.१४ **खेळाडू आरक्षण :-**

८.१४.१ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून २०२२ आणि तदनंतर शासनाने वेळावेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

८.१४.२ प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

८.१४.३ खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याचे अंतिम दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्या प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समाजण्यात येणार नाही.

८.१४.४ एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्याप्रमाणे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

## ८.१५ **दिव्यांग आरक्षण** :-

८.१५.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११८/१६-अ, दिनांक २९ मे २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

८.१५.२ लेखापाल पदाकरीता दिव्यांग सुनिश्चिती संदर्भातील तपशील खालीलप्रमाणे आहे.

| पदनाम | शासन निर्णय | शारिरीक पात्रता | दिव्यांग प्रवर्ग |
|---|---|---|---|
| लेखापाल | शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्र. एफएसटी-०६/२१/प्र.क्र.१६५/फ-४, दि. १९/७/२०२१ | S, ST, MF, RW, SE, C | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, OL, BA, BL, OAL, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD (M), SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |

वरील abbreviation चा पूर्ण अर्थ उक्त शासन निर्णयात नमुद आहे.

८.१५.३ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

८.१५.४ दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग / पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

८.१५.५ दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदावर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

८.१५.६ संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार / व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

**८.१६ अनाथ आरक्षण** :-

८.१६.१ अनाथ व्यक्तीचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का.०३, दिनांक २३ ऑगस्ट २०२१ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

८.१६.२ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

**८.१७ माजी सैनिक आरक्षण** :-

८.१७.१ उमेदवार स्वतः माजी सैनिक असल्यास त्याने त्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यास माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाहीत. तसेच युद्धात / सैन्यदलातील सेवेत मृत्यू पावलेल्या किंवा झालेल्या सैनिकांच्या कुटुंबियास शासकीय सेवेत फक्त एका व्यक्तीला माजी सैनिकांना लागू असलेले १५% आरक्षण लागू राहील (सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आरटीए-१०८२/३५०२/प्र.क्र.-१००/१६-अ, दिनांक २/९/१९८३)

८.१७.२ माजी सैनिंकाकरीता आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार असतील.

**८.१८ प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षण** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २० जानेवारी १९८० तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळावेळी नमूद करण्यात येणा-या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

**८.१९ भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑगस्ट २००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

**८.२० पदवीधर अंशकालिन कर्मचारी यांच्याकरीता आरक्षण** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑक्टोबर २००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळावेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार पदवीधर अंशकालिन कर्मचारी यांच्याकरीता आरक्षण राहील.

**८.२१ रोजंदारी मजूर** :- शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्रमांक वनम-२०१३/प्र.क्र.३३४/फ-९, दिनांक १६/१०/२०१२ अन्वये वनविभागातील रोजंदारी मजुरांना १०% आरक्षण लागू राहील. लेखी परीक्षेत पात्र झालेल्या रोजंदारी मजुरांने त्यांच्या सेवेबाबत, मुळ कागदपत्रांची तपासणीच्या वेळेस त्यांना संबंधित वन विभागातील उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**८.२३** आरक्षित पदांकरिता उमेदवारांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र शासन निर्णय बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दिनांक १२.१२.२०११ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

## ९. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-

९.१ लेखापाल पदावर नियुक्ती झालेल्या व्यक्तीस शासन अधिसूचना क्र. डीएलई-१०७०/३०८०३-F-४, दिनांक ५/२/१९८० नुसार लेखापाल पदावर रुजू झालेनंतर नियुक्त कर्मचा-यांना ४ वर्षात ३ संधीमध्ये विभागीय परिक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य राहील.

९.२ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

९.३ महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

९.४ लेखापाल पदावर नियुक्त झालेली व्यक्ती संबंधीत वनवृत्तात कोठेही बदलीस पात्र राहील.

९.५ महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकामधील तरतुदी उमेदवारांस बंधनकारक राहतील.

९.६ शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक अनियो/१०/०५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ नुसार दिनांक १/११/२००५ रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवारांचा नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना (सद्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजन) लागू राहील.

## १०. इतर महत्वाच्या सूचना :-

**१०.१** निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

**१०.२** उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशिला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविली जाईल.

**१०.३** भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतीम निर्णय घेणे, पडताळणी अंती अर्ज रद्द ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची निवड यादी व प्रतीक्षा यादीस मान्यता देणे, जाहीरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे या बाबतचे संपूर्ण अधिकार प्रादेशिक निवड समितीला आहेत.

**१०.४** उमेदवारांना परीक्षेकरिता, कागदपत्रे पडताळणी करिता कोणत्याही प्रकारचा भत्ता व प्रवास खर्च अनुज्ञेय राहणार नाही.

**१०.५** भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवार कुठल्याही कारणास्तव गैरहजर असेल तर असे उमेदवार भरती प्रक्रियेतून बाद ठरतील व परीक्षा शुल्क नापरतावा राहील.

**१०.६** उमेदवाराने ज्या वनवृत्तात भरतीकरिता ऑनलाइन द्वारे आवेदन सादर केले आहे, केवळ त्याच वनवृत्ताकरीता उमेदवाराचा दावा राहील. इतर वनवृत्तासाठी त्याचा विचार केला जाणार नाही.

**१०.७** मुळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे, कागदपत्र पडतळणीच्या दिनांकाच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

**१०.८** उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना दिलेले भ्रमणध्वनी (मोबाईल क्रमांक) व **ई-मेल** भरती प्रक्रिया संपेपर्यंत कृपया बदलू नये.

**१०.९** ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने विस्तृत जाहिरातीचे काळजीपूर्वक वाचन करावे. जाहिरातीतील सूचना पूर्णपणे वाचूनच ऑनलाईन अर्ज भरण्याची दक्षता उमेदवारांनी स्वतः घ्यावी.

**१०.१०** कोणत्या प्रवर्गातून अर्ज भरावयाच्या आहे हे निश्चित करून नंतरच ऑनलाईन अर्जात तशी माहिती नोंद करावी. नंतर प्रवर्ग बदलण्याबाबत उमेदवाराकडून अभिवेदन अथवा दावा/तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**१०.११** चुकीची/खोटी प्रमाणपत्र सादर करणा-या उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**१०.१२** शासकीय व निमशासकीय कर्मचारी यांना ऑनलाईन परीक्षेमध्ये अर्ज करावयाचे असल्यास तो त्यांचे कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत भरणे आवश्यक राहील.

दिनांक : १/३/२०२३
नागपूर

(डॉ. वाय.एल.पी. राव)
प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन बल प्रमुख)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

## परिशिष्ट-१

### १. नागपूर वनवृत्त :-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखिव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | २ | - | - | १ | - | - | ३ | - | २ | १ | ९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षण विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | - | - | १ | - | - | २ | - | १ | १ | ६ |
| महिला | १ | - | - | - | - | - | १ | - | १ | - | ३ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| दिव्यांग | -- | | | | | | | | | | |
| अनाथ | -- | | | | | | | | | | |

### २. चंद्रपूर वनवृत्त :-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखिव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | १ | २ | - | १ | - | - | - | - | १ | २ | ७ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षण विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | - | १ | - | - | - | - | १ | १ | ५ |
| महिला | - | १ | - | - | - | - | - | - | - | १ | २ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| दिव्यांग | **एकूण १ पद :- अंध / अल्पदृष्टी** (Blind / Low Vision) | | | | | | | | | | |
| अनाथ | - - | | | | | | | | | | |

### ३. गडचिरोली वनवृत्त :-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखिव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | - | २ | १ | - | १ | १ | ३ | - | १ | २ | ११ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षण विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | - | १ | १ | - | १ | १ | २ | - | १ | १ | ८ |
| महिला | - | १ | - | - | - | - | १ | - | - | १ | ३ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| दिव्यांग | **एकूण १ पद :- अंध / अल्पदृष्टी** (Blind / Low Vision) | | | | | | | | | | |
| अनाथ | -- | | | | | | | | | | |

### ४. अमरावती वनवृत्त :-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखिव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | १ | १ | १ | - | - | - | २ | - | २ | २ | ९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षण विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | - | - | - | १ | - | १ | १ | ६ |
| महिला | - | - | - | - | - | - | १ | - | १ | १ | ३ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| दिव्यांग | -- | | | | | | | | | | |
| अनाथ | -- | | | | | | | | | | |

५. **यवतमाळ वनवृत्त :-**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखिव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | - | २ | - | - | - | - | - | - | १ | २ | ५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षण विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | - | १ | - | - | - | - | - | - | १ | १ | ३ |
| महिला | - | १ | - | - | - | - | - | - | - | १ | २ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| दिव्यांग | -- | | | | | | | | | | |
| अनाथ | -- | | | | | | | | | | |

६. **औरंगाबाद वनवृत्त :-**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखिव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | २ | १ | - | - | - | १ | ३ | - | २ | ६ | १५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षण विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | - | - | - | १ | २ | - | १ | १ | ७ |
| महिला | १ | - | - | - | - | - | १ | - | १ | २ | ५ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| दिव्यांग | **एकूण १ पद :- अंध / अल्पदृष्टी** (Blind / Low Vision) | | | | | | | | | | |
| अनाथ | -- | | | | | | | | | | |

### ७. धुळे वनवृत्त :-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखिव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | - | ३ | - | - | १ | १ | १ | - | - | २ | ८ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षण विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | - | २ | - | - | १ | १ | १ | - | - | १ | ६ |
| महिला | - | १ | - | - | - | - | - | - | - | १ | २ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| दिव्यांग | -- | | | | | | | | | | |
| अनाथ | -- | | | | | | | | | | |

### ८. नाशिक वनवृत्त :-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखिव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | २ | - | १ | - | १ | - | २ | - | १ | ४ | ११ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षण विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | २ | ७ |
| महिला | १ | - | - | - | - | - | १ | - | - | १ | ३ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| दिव्यांग | **एकूण १ पद : अस्थीव्यंगता / मेंदूचा पक्षाघात** (Cerebral Palsy) / **कुष्ठरोग मुक्त** (Leprosy Cured) / **शारीरिक वाढ खुंटणे** (Dwarfism) / **आम्ल हल्लाग्रस्त** (Acid Attack Victims) / **स्नायु विकृती** (Muscular Dystrophy) | | | | | | | | | | |
| अनाथ | -- | | | | | | | | | | |

## ९. पुणे वनवृत्त :-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखिव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | २ | १ | - | १ | १ | - | ३ | - | १ | २ | ११ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षण विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | - | १ | १ | - | २ | - | १ | १ | ८ |
| महिला | १ | - | - | - | - | - | १ | - | - | १ | ३ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| दिव्यांग | **एकूण १ पद : अस्थीव्यंगता / मेंदूचा पक्षाघात** (Cerebral Palsy) / **कुष्ठरोग मुक्त** (Leprosy Cured) / **शारीरिक वाढ खुंटणे** (Dwarfism) / **आम्ल हल्लाग्रस्त** (Acid Attack Victims) / **स्नायु विकृती** (Muscular Dystrophy) | | | | | | | | | | |
| अनाथ | -- | | | | | | | | | | |

## १०. ठाणे वनवृत्त :-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखिव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | १ | २ | - | - | १ | १ | ६ | १ | ३ | ६ | २१ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षण विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | - | - | १ | १ | १ | १ | २ | १ | ९ |
| महिला | - | १ | - | - | - | - | २ | - | १ | २ | ६ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | २ |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | २ |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | २ |
| दिव्यांग | **एकूण १ पद : अस्थीव्यंगता / मेंदूचा पक्षाघात** (Cerebral Palsy) / **कुष्ठरोग मुक्त** (Leprosy Cured) / **शारीरिक वाढ खुंटणे** (Dwarfism) / **आम्ल हल्लाग्रस्त** (Acid Attack Victims) / **स्नायु विकृती** (Muscular Dystrophy) | | | | | | | | | | |
| अनाथ | -- | | | | | | | | | | |

## ११. कोल्हापूर वनवृत्त :-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखिव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | १ | १ | १ | १ | १ | - | २ | - | १ | - | ८ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षण विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | १ | १ | - | १ | - | १ | - | ७ |
| महिला | - | - | - | - | - | - | १ | - | - | - | १ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| दिव्यांग | **एकूण १ पद : अस्थीव्यंगता / मेंदूचा पक्षाघात** (Cerebral Palsy) / **कुष्ठरोग मुक्त** (Leprosy Cured) / **शारीरिक वाढ खुंटणे** (Dwarfism) / **आम्ल हल्लाग्रस्त** (Acid Attack Victims) / **स्नायु विकृती** (Muscular Dystrophy) | | | | | | | | | | |
| अनाथ | -- | | | | | | | | | | |

## १२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा. नागपूर यांचे कार्यालय :-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखिव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | १ | १ | १ | - | - | १ | २ | - | १ | ५ | १२ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षण विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | - | - | १ | १ | - | १ | ३ | ९ |
| महिला | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | २ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| दिव्यांग | **एकूण १ पद : अस्थीव्यंगता / मेंदूचा पक्षाघात** (Cerebral Palsy) / **कुष्ठरोग मुक्त** (Leprosy Cured) / **शारीरिक वाढ खुंटणे** (Dwarfism) / **आम्ल हल्लाग्रस्त** (Acid Attack Victims) / **स्नायु विकृती** (Muscular Dystrophy) | | | | | | | | | | |
| अनाथ | -- | | | | | | | | | | |

## परिशिष्ट-२

## निवड प्रक्रियेचे टप्पे

| अ.क्र. | टप्पा |
|---|---|
| १ | २ |
| १ | ऑनलाईन अर्ज स्वीकारणे (www............) |
| २ | प्रवेश पत्र / हॉल तिकीट निर्गमित करणे (www.................) |
| ३ | ऑनलाईन लेखी परीक्षा (www.................) |
| ४ | लेखी पेरीक्षेच्या अनुषंगाने आदर्श उत्तरपत्रिका वेबसाईटवर प्रसिध्द करणे (www.................) |
| ५ | आदर्श उत्तरपत्रिकेच्या अनुषंगाने चुकीच्या छाप प्रश्नाविरूध्द आक्षेप (असल्यास) प्राप्त करणे (www.....................) |
| ६ | ऑनलाईन लेखी परीक्षेचा निकाल जाहीर करणे (www.......................) |
| ७ | कागदपत्रे तपासणी (www...................) |
| ८ | लेखी परीक्षेतील गुणांचे आधारे निवड यादी व प्रतीक्षा यादी वेबसाईटवर जाहीर करणे (www..............) |

**टिप** :- (१) वरील वेळापत्रकाप्रमाणे स्थळ व वेळ .................................. संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

(२) वरील वेळापत्रक, स्थळ व वेळेमध्ये बदल झाला असल्यास .................................... संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

***************

# परिशिष्ट-३

## लहान कुटुंबासाठी प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------------- श्री ----------------------यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ------ वर्ष --------- राहणार ----------------------------याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी --------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२. आज रोजी मला-----------------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८.३.२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या आहे (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असले तर दिनांक २८.३.२००५ वा तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक :- **अर्जदाराची स्वाक्षरी**

स्थळ :-

**नांव** :-